१९२/२५०५ २९/३/१३ प्र. आमि. (वि.नि.)

मा॰दय,
उचित कार्यवाहीसाठी
कृपया अग्रेषित

प्रअ/विनि/४
२०१३-१४

प्रअ/विनि/४
२०१३-१४

महापालिका आयुक्त
व्हीय चिटणीस


RNI No. MAHBIL /2009/40124

Reg. No. MH/MR/South-358/2012–14


सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच


वर्ष ५, अंक ६(११)] शुक्रवार, एप्रिल ५, २०१३/चैत्र १५, शके १९३५ [पृष्ठ ४, किंमत : रुपये १३.००


**असाधारण क्रमांक १८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** [redacted]

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ५ एप्रिल २०१३ रोजी पुर:स्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे:—

**L. A. BILL No. IX OF 2013.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.

**सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९६२ चा महा. ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौसष्ठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम, २०१३ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

१९६२ चा महा. ३. २. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ याच्या कलम ४३-१अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल:— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ४३-१ब नव्याने समाविष्ट करणे.

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र.

" **४३-१ब.** राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विनिर्दिष्ट निदेशांच्या अधीन राहून, महामंडळास कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून अधिसूचित करता येईल, ज्यात प्रचलित औद्योगिक धोरणानुसार एकूण क्षेत्राच्या किमान साठ टक्के क्षेत्र हे औद्योगिक विकासासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित क्षेत्र, निवासी व वाणिज्यिक प्रयोजनांसह पूरक प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल; आणि अशी अधिसूचना काढल्यावर, महामंडळ हे, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ या अन्वये अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण होईल आणि अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राचा विकास हा, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या संबद्ध तरतुदींन्वये महामंडळाने तयार केलेल्या आणि राज्य शासनाने मंजुरी दिलेल्या प्रस्तावित आराखड्यानुसार आणि विकास नियंत्रण विनियमांनुसार विनियमित करण्यात येईल.".

१९६६ चा महा. ३७.

१९६६ चा महा. ३७.

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रमुख अभियंता (विकास नियोजन)
यांचे कार्यालय
30 MAY 2013
[redacted]
क्र.प्र.अ./वि.नि./
3/1/5/12 1/6/13

AO(DP)I
P). Circulate to all engineers / B.P. sections.

31/5/13
प्रमुख अभियंता
विकास नियोजन

CHE/ 6569 /DP/GEN OF

COPY TO

D.M.C. (Vig.) / Dir. (ES&P)

CH.E.D.P.

DY.CH.E.D.P.(I)/II

DY.CH.E.B.P.(CITY)/ES/WS – I / II

E.E.(P)TO DIR (ES&P)/E.E.(P) TO CH.E.D.P. / O.S.D. to M.C.

E.E.D.P. (CITY)/E.E.D.P.(WS) (P&R) (H&K) /E.E.D.P.(ES)

E.E.B.P.(CITY)(I)(II)(III)/E.E.B.P. (E.S.) I / II.

E.E.B.P. (W.S.) (H&K/E)(K/W&P)(R)/E.E.T.P.(VARIATION)

A.E.D.P. (City) (I)(II)(III)

A.E.D.P.(L&N) (S&T)/A.E.D.P.(M)/A.E.D.P.(H/E&K/E)(H/W&K/W)

A.E.D.P.(P/S) (P/N)/A.E.D.P. (R/N)(R/S)(R/CENTRAL)

S.E.D.P.

Copy forwarded for information and necessary action please.

04/07/13

ADMINISTRATIVE OFFICER

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र शासनाने, अलिकडेच दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजी नवीन औद्योगिक धोरण, २०१३ जाहीर केले आहे. उक्त धोरणाच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांपैकी ' एकात्मिक औद्योगिक क्षेत्र ' ही एक संकल्पना आहे, ज्यात औद्योगिक धोरणानुसार एकूण क्षेत्राच्या किमान साठ टक्के क्षेत्र हे औद्योगिक विकासासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित क्षेत्र, निवासी व वाणिज्यिक प्रयोजनांसह पूरक प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल. एकात्मिक औद्योगिक क्षेत्राची उक्त संकल्पना अंमलात आणण्यासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३) यामध्ये, कलम ४३-१ब नव्याने समाविष्ट करून सुधारणा करणे इष्ट वाटते.

प्रस्तावित नवीन कलम ४३-१ब मध्ये, महामंडळास राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विनिर्दिष्ट निदेशांच्या अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून अधिसूचित करता येईल, ज्यात प्रचलित औद्योगिक धोरणानुसार एकूण क्षेत्राच्या किमान साठ टक्के क्षेत्र हे औद्योगिक विकासासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित क्षेत्र, निवासी व वाणिज्यिक प्रयोजनांसह पूरक प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल ; आणि अशी अधिसूचना काढल्यावर, महामंडळ हे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) या अन्वये, अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण होईल आणि अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राचा विकास हा, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या संबद्ध तरतुदींन्वये महामंडळाने तयार केलेल्या आणि राज्य शासनाने मंजुरी दिलेल्या प्रस्तावित आराखड्यानुसार आणि विकास नियंत्रण विनियमांनुसार विनियमित करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

२. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३ एप्रिल २०१३.

**नारायण राणे,**
उद्योग मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड २.**—महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यामध्ये नवीन कलम ४३-१ब समाविष्ट करणाऱ्या या खंडान्वये, राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विनिर्दिष्ट निदेशांच्या अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला, ज्यात प्रचलित औद्योगिक धोरणानुसार एकूण क्षेत्राच्या किमान साठ टक्के क्षेत्र हे औद्योगिक विकासासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित क्षेत्र, निवासी व वाणिज्यिक प्रयोजनांसह पूरक प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल, एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्याचा अधिकार महामंडळाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर उल्लेखिलेला प्रस्ताव सामान्य स्वरूपाचा आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ५ एप्रिल २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.